# चेटूक

दोन अंकी नाटक

## ले. प्रल्हाद जाधव

**पात्रे:**

अमोल देसाई (३०)

प्रभा देसाई (२५)

विलास देशमुख (३०)

चंद्रशेखर नवलकर (४५)

**अंक पहिला / प्रवेश पहिला**

(बासरी वाजत आहे. अंधारातच पडदा उघडतो. हळूहळू प्रकाश. घराचा दिवाणखाना दिसतो. मधोमध दरवाजा. एकीकडे आत किचन, बेडरुम. एकीकडे गॅलरी. गॅलरीत छोटासा बगीचा. काही टांगलेल्या कुंड्या. बैठकीची छान आकर्षक व्यवस्था. दिवाणाच्या मागे स्टँडवर काही आकर्षक शोभेच्या वस्तु. त्यातच एक बासरी. बाजूच्या भिंतीवर निदर्शनास येईल असा एक मृदुंग. पूर्ण प्रकाश येतो तेव्हा अमोल झोपाळयावर बसून बासरी वाजवताना दिसतो. किचनमधून प्रभा येते. ती पाच महिन्यांची गरोदर आहे. हातात झारी. गॅलरी झाडांना पाणी घालू लागते.)

प्रभा : (पाणी घालता घालता )मोगऱ्याला किती सुंदर कळ्या आल्यात, पाहिलंस का?

अमोल : हो माहिताय मला.

प्रभा : काल-परवापर्यंत काही कल्पनाही आली नाही... आणि हे पानफुटीचं रोप पाहिलसं का किती झपाटयानं वाढत चाललंय ते... येत्या काही दिवसात जंगल करुन टाकणार ते आपल्या घराचं अस दिसतंय...

अमोल : तुझ्या हातचं पाणी रोज मिळालं तर जंगल होणार नाही तर दुसरं काय होणार?

प्रभा : गुलाबालाही कळ्या येऊ लागल्या बरं का.

अमोल : (तिकडे जात) बघू - बघू, वा! खरंच की. पण मला खरा आनंद कधी होईल माहीत आहे का?

प्रभा : कधी, कधी?

अमोल : ( तिला जवळ घेत) आमच्या या लाडक्या वेलीवर फुल येईल तेव्हा!

प्रभा : (स्वतःला सोडवून घेत) एवढी काय घाई झालेय? थांब अजून थोडे दिवस. (आत जायला निघते. अमोल हसतो. पुन्हा झोपाळ्यावर बसून बासरी वाजवू लागतो. प्रभा आतून पुन्हा झारी भरून आणते. झाडांना पाणी घालता घालता अमोलकडे पहात)

प्रभा : दिवस कसे गेले कळलचं नाही!

अमोल : ( तिच्याकडे निरखून पहात) पाच महिने झाले ना?

प्रभा : ( डोक्यावर हात मारत) च् - अरे ते दिवस नाही म्हणत मी

अमोल : मग?

प्रभा : आपण एकमेकाला भेटलो काय - ओळखीचं प्रेमात रुपांतर झाल काय - नंतर लगेच लग्न झालं काय...

अमोल : आणि त्यानंतर लगेच मुलाची तयारी केली काय! (हसतो)

प्रभा : काय हे? दुसरं काही सुचत नाही का रे तुला?

अमोल : खरंच काही नाही सुचत दुसरं.

प्रभा : तरी बरं अजून फक्त चारच महिने थांबायचयं.

अमोल : खरचं प्रभा, मुलाचं तोंड बघायला अगदी उतावीळ झालोय मी.

प्रभा : आणि मी नाही का?

अमोल : आणि हो–

प्रभा : काय?

अमोल : केवळ एकच नको...

प्रभा : मग?

अमोल : किमान अकरा तरी पाहिजेतच.

प्रभा : अकरा?

अमोल : होय.

प्रभा : म्हणजे क्रिकेटची टीम म्हणतोयस का?

अमोल : अगदी बरोबर. आणि पंच म्हणून तू बारावी!

प्रभा : एवढी अकरा मुलं झाल्यावर पंचगिरी करायला जिवंत तरी राहीन का मी? (दोघंही हसतात)

अमोल : अकराचं सोड. पण दोन तरी पाहिजेत प्रभा. घर अगदी डोक्यावर घेतलं पाहिजे त्यांनी. एक खेळतोय, एक पडतोय, एक रडतोय, एक केकाटतोय, एकाला भूक लागलेय, तर दुसऱ्याला झोप आलीय. एकाचं नाक गळतंय, तर एकाची चड्डी सुटलेय... आणि त्यांचं सगळं करता करता तुझा जीव मेटाकुटीला येतोय... ही सगळी घाईगर्दी, धांदल, मुलांचे बोबडे बोल, सगळे रंग, सगळे ढंग यांनी घर अगदी भरुन जायला पाहिजे. त्या क्षणाची वाट पाहतोय मी...

प्रभा : तुला एक विचारायचं होतं–

अमोल : विचार की!

प्रभा : जाऊ दे, नको...

अमोल : अगं विचार की, त्यात काय एवढं?

प्रभा : विलासच्या बाबतीत काही गैरसमज करुन घेतला नाहीस ना तू?

अमोल : (हसत) अगं वेडी आहेस का तू? विलास जसा तुझा मित्र आहे तसा माझाही नाही का? काही त्याच्या विषयी मनात ठेवलं नाही मी...

प्रभा : खरंच?

अमोल : अगदी तुझ्या गळ्याची शपथ...

अमोल : आणि तुला एक अगदी मनापासून सांगू का?

प्रभा : काय ते?

अमोल : माझ्यापेक्षा विलास तुला अधिक शोभून दिसला असता.

प्रभा : बस कर आता...

अमोल : अगं खरंच. काय खोटं आहे त्यात? पण शेवटी थोडं नशीबही लागतं. विलासपेक्षा मी थोडा अधिक नशीबवान ठरलो इतकंच!

प्रभा : खरं आहे. आपलं लग्न ठरल्याचं समजलं तेव्हा किती निर्मळ मनानं भेटला आपल्याला... येतोय ना जेवायला आज?

अमोल : (आठवून) अरे हो विसरलोच होतो मी. चांगला पुरणपोळीचा बेत कर.

प्रभा : पुरणपोळी खूप आवडते त्याला.

अमोल : (हसतो)

प्रभा : हसायला काय झालं?

अमोल : विलासची आवड अगदी बारकाईनं लक्षात ठेवलीस म्हणून.

प्रभा : बघ. जळतोयंस तू त्याच्यावर. आताच म्हणालास नं काही मनात ठेवलं नाहीस म्हणून! जळा,जळा!

अमोल : गंमत केली गं.

प्रभा : (गंमतीने) तुला त्याचा हेवा वाटतो हे मान्य कर. (दारावरची बेल वाजते.) आला वाटतं. (जाऊन दरवाजा उघडतो. दारात विलास उभा.)

अमोल : थिंक ऑफ ए डेव्हिल अँड डेव्हिल इज देयर!

विलास : का रे बाबा मला सैतान पदावर बसवलंस आज?

अमोल : शंभर वर्ष आयुष्य आहे तुला.

विलास : शंभर वर्ष? आता खरं म्हणजे शंभर वर्षाच्या आयुष्याची गरज तुलाच आहे.

अमोल : ते का बरं?

विलास : आता एकटा नाहीस तू. दोनाचे चार झालेत...

अमोल : हो, आणि लवकरच चाराचे सहा होणार आहेत. (दोघेही हसतात)

विलास : (प्रभाला) कसा काय चाललाय संसार?

प्रभा : फर्स्टक्लास. तुझाच विषय चालला होता...

विलास : का?

प्रभा : अरे तू जेवायला येणार ना म्हणून बेत काय करायचा याची चर्चा चालली होती.

विलास : असं होय? काय ठरलं मग शेवटी?

अमोल : दुसरं काय? (प्रभाकडे पहात) तुझी आवडती पुरणपोळी!

विलास : वा! आठवणीनंच तोंडाला पाणी सुटतय नुसतं. बऱ्याच दिवसात तुझ्या हातची पुरणपोळी खाल्ली नव्हती. चल् कामाला लाग! असं झालंय की तव्यावरची गरम गरम उचलतो आणि डायरेक्ट स्वाहा करतो.

अमोल : असा आधाशीपणा करु नये. माणसानं. थंड करुन खावी कोणतीही गोष्ट!

विलास : थंड होईपर्यंत धीर नसतो. खावो आपल्याला, पिओ, मजा करो...

प्रभा : 'पिण्या' ची सवय कमी कर जरा आता.

विलास : काय करणार कमी करुन ? आता लग्न होणार आहे का थोडंच आपलं?

अमोल : ए बाबा, व्यवस्थित चाललंय आमचं सर्व. आता मध्येच काही उपद्व्याप करु नको. आणि तुझं लग्न हिच्याशी झालं नाही यात माझा काही दोष नाही. त्याच वेळेला मी हिला म्हटलं होतं की, विचार करुन निर्णय घे. नंतर घोटाळा नको...

प्रभा : आणि मी 'विचार करुन' निर्णय घेतला.

विलास : मग आता पश्चाताप होत असेल ना?

प्रभा : (हसत) हो तर... अरे दिवसा स्वप्न पाहणारा तुझा हा भाबडा मित्र. त्याला माझ्यासारखी बायको मिळाली नसती तर याची सगळी स्वप्न आकाशाऐवजी पाताळातच घालवली असती तिनं.

विलास : याच्या संपत्तीचा मोह नव्हता तुला?

प्रभा : अजिबात नव्हता. उलट तुझंच लक्ष होतं त्यावर. (तिघेही हसतात)

विलास : चला, भंकस खूप झाली. मी चहा आणतो मस्तपैकी आपल्यासाठी.

प्रभा : अरे मी करते की!

विलास : नको नको!

अमोल : तू तर अगदीच नको. जायची तोंडाची! (हसतो)
प्रभा : ओके. साखरेचा डबा कुठाय ते माहीत आहे ना?
विलास : अगदी व्यवस्थित! (आत जायला निघतो)
अमोल : आता आलं माझ्या लक्षात तुमचं कारस्थान!
विलास : कसलं कारस्थान?
अमोल : तू आता आत जाऊन चहा घेऊन येणार, त्या चहात विष असणार, चहा घेतल्यावर मी लगेच मरणार आणि मग तुम्ही माझी विल्हेवाट लावून, लग्न करुन माझ्या संपत्तीवर आरामात जगत राहणार. ( तो जीभ बाहेर काढून मेल्याची ॲक्शन करुन दाखवतो. तिघेही मोकळेपणाने हसतात. (विलास किचन मध्ये जातो. बेल वाजते. प्रभा दरवाजा उघडते. तेथे चंद्रशेखर नवलकर उभा.)
नवलकर : नमस्कार!
प्रभा : नमस्कार!
नवलकर : मी आत येऊ शकतो का?
प्रभा : पण कोण आपण? मी ओळखलं नाही.
नवलकर : (परवानगी मिळाल्याप्रमाणे आत येतो. हनुवटीवर छोटीशी दाढी. वर वळविलेल्या टोकदार मिशा. दोरी कानावरुन लोंबकळणारा चष्मा. जाकिट. हातात सेल्समनकडे असते तशी बॅग. अमोलला ) नमस्कार!
अमोल : नमस्कार ! आपण कोण?
नवलकर : (हसत) मी ओळख करुन देतो...
प्रभा : काही गरज नाही त्याची. तुम्ही व्हॅक्युम क्लिनर विकायला आला असाल तर तो आहे आमच्याकडं...
नवलकर : (हसतो)
प्रभा : शिवाय आमचा गॅसही संपलेला नाही. आणि फ्रिज, ओव्हन, झालंच तर बाथरुममधला नळ. सगळं अगदी व्यवस्थित सुरू आहे.
अमोल : शिवाय परवा तुमच्यासारखाच एकजण येऊन जनगणनेची माहितीसुध्दा घेऊन गेला...
नवलकर : कसली माहिती?
अमोल : जनगणनेची! काहीही लपवून ठेवलं नाही. लोकसंख्येत भर घालण्याचा कार्यक्रम सुरु आहे आमचा हेही सांगितलं...
नवलकर : (हसतो)
अमोल : शिवाय आमचा विमाही उतरवलेला आहे.
नवलकर : (पुन्हा हसतो.)
अमोल : हसायला काय झालं एवढं?
नवलकर : तुमच्यासारखी मोकळ्या स्वभावाची माणसं भेटली की काम सोपं होऊन जातं आमचं... मी बसू का?
प्रभा : अहो काय चाललंय काय तुमचं? बेधडकपणे घरात काय घुसताय? हसताय काय? बसायची परवानगी काय मागताय? वेटिंग रुम वाटली की काय तुम्हाला ही एखादी?
नवलकर : मी कुठं तसं म्हटलंय? डिरेक्टरीत नाव वाचलं, पत्ता घेतला आणि आलो. (अमोलकडे पहात) अमोल देसाई आपणच ना?

अमोल : मीच तो. पण हे बघा मिस्टर ...
नवलकर : नवलकर... चंद्रशेखर नवलकर!
अमोल : ठीक आहे मिस्टर नवलकर, काय ते लवकर बोला. सुट्टीचा दिवस फुकट घालवायचा नाही आम्हाला.
नवलकर : मघाशी तुम्ही म्हणालात की तुमचा विमा उतरवलाय पण खरं वाटत नाही ते...
अमोल : कशावरुन?
नवलकर : तुमचं टेम्परामेंट लक्षात घेतलं तर विमा एंजटला उभं करणही शक्य नाही तुम्ही...
अमोल : पॉलिसीचे पेपर्स आणून दाखवले असते तुम्हाला आता पण त्यात वेळ जायला नको. बोला काय ते लवकर !
नवलकर : पण मी बसू की नको?
प्रभा : बसल्याशिवाय राहणार आहात का तुम्ही? बसा!
नवलकर : (बसत) आम्ही एक मंडळ स्थापन केलंय.
प्रभा : कसलं मंडळ, काय काम चालत तिथं?
नवलकर : आमचं काम अगदी सिक्रेट स्वरुपाचं असतं. आमच्या सभासदांनाच त्याची माहिती मिळू शकते. म्हणजे तुम्ही जर आमच्या मंडळाचे सदस्य झालात तरंच तुम्हाला ती माहिती मिळू शकेल. (विलास घेऊन बाहेर येतो.)
विलास : (प्रभाला) पाहुणे कोण?
प्रभा : ते अजून आम्हालाही समजलेल नाही.
विलास : ओके. नो प्रॉब्लेम. (नवलकरना) चहा घेता का?
नवलकर : (चहाचा कप उचलत) हो घेतो की, थँक्यू ! (सर्वजण चहा घेऊ लागतात. नवलकर चहाचे घुटके घेत घर पाहतो. भिंतीवरील एऐ फोटोकडं पहात)
नवलकर : हा फोटो कुणाचा, तुमच्या वड्लांचा का?
अमोल : हो.
नवलकर : वारकरी होते वाटतं?
अमोल : हो. मरेपर्यंत आषाढी - कार्तिकीची वारी कधी चुकवली नाही. तोंडात सारखं पांडुरंगाचा नांव असायचं. मृदुंग फार भन्नाट वाजवायचे...
नवलकर : (मृदुंगाकडे पाहत) म्हणजे हा मृदुंग त्यांची आठवण म्हणून ठेवलाय तुम्ही!
अमोल : अगदी बरोबर! (विलासला त्यांची ओळख करुन देत) हे मिस्टर ...
नवलकर : (स्वत:च) चंद्रशेखर नवलकर!
विलास : नमस्कार!
नवलकर : नमस्कार!
विलास : काय करता आपण?
नवलकर : तेच सांगत होतो... आमचं एक मंडळ आहे. 'वंशवर्धन सन्मित्र मंडळ'...
विलास : काय म्हणलात?
नवलकर 'वंशवर्धन सन्मित्र मंडळ'.
विलास : नाव कधी ऐकलं नव्हतं हे. काय करता या मंडळात तुम्ही?

नवलकर : हेच, म्हणजे असं की– माणसाच्या मनात वंशसातत्याची एक उपजत प्रेरणा असते.
प्रभा : कसली प्रेरणा?
नवलकर : वंशसातत्याची!
प्रभा : म्हणजे?
नवलकर : म्हणजे प्रत्येकाला असं वाटतं की, आपला वंश सतत वाढत राहिला पाहिजे, मुलंबाळं झाली पाहिजेत....
अमोल : (रस घेत) बरोबर!
नवलकर : मुलं झाली नाहीत तर पितरांच्या आत्म्याला शांती लाभत नाही असं मानतो आपण...
विलास : समजलं, म्हणजे वंध्यत्वावरचं औषध शोधून काढलय तुम्ही!
नवलकर : (हसत विलासला ) आपण कोण यांचे?
अमोल : फॅमिली फ्रेंड आहे ते आमचे... मिस्टर देशमुख, विलास देशमुख.
नवलकर : वा, छान. काय काम करता आपण?
विलास : बॉलपेनच्या रिफिलची फॅक्टरी आहे माझी. नवलकर : म्हणजे शाई संपली की पुन्हा भरायची!
विलास : अगदी बरोबर.
नवलकर : गूड गूड ! (प्रभाला) तुमचं नाव नाही सांगितलत तुम्ही अजून.
प्रभा : मी प्रभा. आणि हा माझा नवरा...
नवलकर : हो त्यांना ओळखतो मी. (विलासला ) तुम्ही ह्यांचे मित्र म्हणजे... आय मीन जवळचे की दूरचे?
प्रभा : या नको त्या चौकशा कशाला करताय तुम्ही?
नवलकर : नाही म्हणजे या माहितीची गरज आहे म्हणून विचारतो. राग मानू नका... प्लीज....
विलास : जवळचे म्हणजे अगदी जीवाभावाचे. सख्खे भाऊ असंच समजा ना. अगदी आमचा ब्लडग्रुपही एकच आहे !
नवलकर : (हसत) आता ब्लड काढून दाखवू नका म्हणजे झालं... (पुन्हा हसतो)
प्रभा : काय माणूस आहे!
नवलकर : बाय द वे लग्न झालंय का तुमचं?
विलास : नाही, आणि त्यामुळेच मला तुमच्या त्या वंध्यत्वावरच्या औषधाचा काहीही उपयोग नाही. (हसतो.)
नवलकर : गैरसमज करुन घेऊ नका. लग्न झालेल नसलं तरीही तुम्हाला आमच्या मंडळाचं सदस्यत्व मिळू शकतं. आणि तुम्ही यांचे अगदी जीवाभावाचे मित्र असल्यामुळे सवलतीच्या दरात, काय? (हसतो )
प्रभा : तुम्ही नेमकं काय करता तुमच्या मंडळात ते अजून सांगितलं नाही.
नवल : 'प्रतिरुप बिजारोपणा'चा व्यवसाय आहे आमचा !
तिघेही : (एकदमच) काय?
नवलकर : प्रतिरुप बिजारोपण !
अमोल : प्रतिरुप बिजारोपण? हा काय प्रकार आहे
नवलकर : अगदी सोप्या भाषेत सांगायचं तर एका वस्तुसारखी हुबेहुब दुसरी वस्तु तयार करायची. एका फुलासारखं दुसरं फुल, एका झाडासारखं दुसरं झाड, एका प्राण्यासारखा दुसरा प्राणी...
प्रभा : म्हणजे क्लोनिंग म्हणताय का तुम्ही?

नवलकर : अगदी बरोबर!

अमोल : पण या साऱ्याचा आमच्याशी काय संबंध?

नवलकर : माणसासारखा माणूस तयार करतोय आम्ही तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रयोग सुरु आहेत आमचे.

अमोल : पण आम्ही नेमकं काय करायचं यात, समजलो नाही.

नवलकर : तुम्ही दुसरं काहीही करायचं नाही. फक्त आमच्यावर विश्वास ठेवायचा. आणि आमच्या मंडळाचं सदस्य व्हायचं.

अमोल : म्हणजे त्यासाठी आम्ही तुमचा फॉर्म भरायचा आणि वर्गणी द्यायची असंच की नाही ?

नवलकर : अगदी बरोबर पण आजचा दिवस विनामूल्य नोंदणीचा दिवस म्हणून निश्चित केलाय आम्ही. अशी संधी परत येणार नाही...

अमोल : पण या योजनेचा आम्हाला नक्की फायदा काय ते तुम्ही सांगितलेलं नाही अजून.

नवलकर : (समजावत) आपण बँकेत पैसे ठेवतो की नाही?

अमोल : हो ठेवतो की.

नवलकर : आणि हवे तेव्हा काढतो की नाही?

अमोल : अर्थात्!

नवलकर : त्याचप्रमाणं आपल्या शरीरातल्या काही पेशी काढायच्या आणि आमच्याकडे सोपवायच्या. तुम्हाला जेव्हा त्या परत हव्या असतील तेव्हा आम्ही तुम्हाला त्या सव्याज परत करणार...

अमोल : म्हणजे जिवंत पेशी?

नवलकर : अर्थातच! 'क्रायोजनिक स्टेट' मध्ये आपल्या पेशी अनंत काळ जशाच्या तशा जिवंत राहू शकतात. आणि केव्हाही आपण त्या पुन्हा वापरात आणू शकतो...

अमोल : पण आम्ही कशासाठी पेशी द्यायच्या?

नवलकर : म्हणजे... आता असं बघा... अगदीच सोपं करुन सांगायचं झालं तर... समजा उद्या (विलासला) तुम्ही गंभीररित्या आजारी पडलात किंवा अचानक हे जग सोडून गेलात... तर तुमच्या पेशी काढून त्याचं बिजारोपण करायचं...आणि तुमच्यासारखाच दुसरा विलास निर्माण करायचा... (प्रभा पुढे होऊन खाड्कन नवलकरच्या थोबाडीत देते. या अचानक हल्ल्याने तो गडबडतो, धडपडतो, गाल चोळत उठतो, बॅग उचलतो आणि बाहेर निघतो. जाण्यापूर्वी पुन्हा बॅग खाली ठेवतो. खिशातून एक छोटे पाकिट काढून त्यातून आपले व्हिजिटिंग कार्ड बाहेर काढून सर्वांना दाखवत टीपॉयवर ठेवत)

नवलकर : हे माझं व्हिजिटींग कार्ड! जेव्हा गरज लागेल तेव्हा अवश्य बोलवा! विश यू ऑल द बेस्ट ( थोडासा लवून सर्वांना अभिवादन करुन बाहेर पडतो. तिघेही स्तंभित. गूढ, उत्कंठावर्धक संगीत.अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(घर. प्रकाश. अमोल वडिलांच्या फोटोला पुष्पहार घालून पाया पडतो. नंतर तो आपल्या नेहमीच्या जागेवर येऊन बसतो आणि बासरी वाजवू लागतो. काही वेळाने प्रभा चहा घेऊन बाहेर येते. आता ती नऊ महिन्याची गरोदर.

प्रभा : (चहा कप पुढे करत) घे!

अमोल : मी म्हटलं होतं ना की, मी चहा करतो म्हणून! पण  ऐकतेस का तू!
प्रभा : (हसत) जाऊ दे रे त्यात काय एवढं?
अमोल : अग पण अशा अवघडलेल्या स्थितीत तुला त्रास देणं बरं आहे का?
प्रभा : काही विशेष नाही त्यात.
अमोल : तुझा चहा कुठाय?
प्रभा : मला नको सकाळीच घेतलाय मी. पहाटेपासून  जागीच आहे.
अमोल : अर्धा कप तरी घे मग.
प्रभा : अरे खरंच नको.
अमोल : ओके. (घुटका घेत) पहाटेपासून कशाला जागी आहेस?
प्रभा : बॅग भरत होते? हॉस्पिटलमध्ये जायचंय सकाळी माहीत आहे ना?
अमोल : ते कसं विसरेन मी? मी तुला काय सांगितलंय ते विसरु नको म्हणजे झालं !
प्रभा : काय ते?
अमोल : लेबररुममध्ये जायचं ते निदान दोन मुलं तरी घेऊनच बाहेर पडायचं!
प्रभा : म्हणजे जुळी मुलं म्हणतोस का?
अमोल : अगदी बरोबर ! (हसतो)
प्रभा : (गंभीर) हाती - पायी धड सुटले तरी खूप झालं...
अमोल : असं का म्हणतेस? अगदी नॉर्मल डिलीव्हरी होईल असं म्हणाले ना डॉक्टर? आणि मला मुलगा की मुलगी याची काळजी नाही. मुलगी झाली तर पऱ्यांची राणी आणि मुलगा झाला तर सोनेरी केसांचा राजपूत्र! काय?
प्रभा : फार रोमँटिक झालायंस.
अमोल : आपण एक स्वप्नच जगतोय असं वाटतंय प्रभे.
प्रभा : अरे कसलं स्वप्न? निसर्गाचा नियमच आहे तो. आपण दोघे एकत्र आलो आणि शरीरानं आपली कामगिरी बजावली.
अमोल : इतकी सोपी गोष्ट नाही ती. दोन शरीरं एकत्र आली म्हणजे दोन यंत्र एकत्र आली असं होत नाही कधी. तिथं आपली मनंही असतात, आत्मा असतो, आपल्या संपूर्ण मानवी संस्कृतीचा इतिहास आपल्या मीलनामागं उभा असतो. स्त्री आणि पुरुष हे दोन किनारे एकत्र आणणारा आत्मा नावाचा अदृश्य पूल मुलांच्या रुपाने आपल्याला एकत्र आणतो. मुलं आपल्या इतिहासाला वर्तमान आणि वर्तमानाला भविष्य देतात– किती विलक्षण आहे हे जीवनाचं सातत्य. आनंदानं वेडा होईन मी प्रभे!
प्रभा : आई कोण होणार आहे तू की मी?
अमोल : पण मीसुद्धा बाप होणार आहे हे लक्षात ठेव.
प्रभा : (हसत) मुलाचा बाप कोण याची खात्रीशीर माहिती फक्त त्याची आईच देऊ शकते हे माहीत आहे ना तुला?
अमोल : मला पेचात पकडून काहीतरी वसूल करण्याचा डाव आहे तुझा. पण हे आधीच ओळखलं होतं मी ...
प्रभा : म्हणजे?
अमोल : जरा थांब. (बॅगेतून एक मखमली पेटी काढतो आणि आतील मोत्याची आंगठी काढून तिला देत) घे !
प्रभा : काय?

अमोल : तुझ्यासाठी आणलेय, बघ तर खरं...

प्रभा : (ओढून घेत) व्वाव! मोत्याची अंगठी! (अंगठीचं चुंबन घेत) थँक्यू अमोल, थँक्यू सो मच! लव्ह यू अम्या !

अमोल : अग त्यात काय थँक्यू म्हणायचं? हा शिंपल्यातला पाणीदार मोती मी जसा तुला दिला त्याचप्रमाणं आता तू तुझ्या शिंपल्यातला पाणीदार मोती मला द्यायचा, झालं!

प्रभा : खरंच मॅड होशील तू असं दिसतंय आता...

अमोल : खरंच मॅड होईन मी! ( वडिलांच्या फोटो जवळ जात) आज बाबा असते तर किती आनंद झाला असता त्यांना. (फोटोकडे पहात) मुलगा झाला तर मी असं समजेन बाबा, की तुम्हीच माझ्या पोटी आला आहात.

प्रभा : खरंच आज असायला हवे होते ते! पण माणसाचं जगणं किती क्षणभंगूर असतं नाही?

अमोल : हो, आता होतं-आता नाही. फुलपाखराच्या पंखाची उघडझाप व्हावी तितकं क्षणभंगूर!

प्रभा : त्या नवलकरचं म्हणणं खर असतं तर बाबांना प्रतिरुपाच्या रुपानं जिवंत ठेवता आलं असतं...

अमोल : अगं काय त्या वेड्या माणसाचं मनावर घेतेयस? (बेल वाजते.)

अमोल : (हसत) आला वाटतं!

प्रभा : कसला येतोय तो, चांगला प्रसाद दिलाय त्याला. आयुष्यभर लक्षात ठेवील... (अमोल दरवाजा उघडतो. दारात विलास.) अरे तू होय?

विलास : तुला काय वाटलं?

अमोल : आम्हाला वाटलं नवलकर आला की काय.

विलास : नवलकर? (तिघेही हसतात. )

अमोल : ( विलासला) कॉग्रेच्युलेशन्स, अभिनंदन !

विलास : माझं अभिनंदन, आणि ते कशासाठी?

अमोल : अरे प्रभा आता आई होणार आता.

विलास : ते माहिताय मला पण तिच्या आई होण्याशी माझा काय संबंध?

प्रभा : मी आई होण्याच्या योजनेत तुझा काहीतरी हात वगैरे असावा, असा दाट संशय आहे त्याला.

विलास : माझा हात कसा काय असणार, मी काही परकीय शक्ती वगैरे वाटलो की काय तुला? (हसतात)

अमोल : अरे तू आता काका होणार ना म्हणून तुझं अभिनंदन केलं.

विलास : असं होय, पण त्यासाठी माझा काका करायचं कारण काय? तू माझा भाऊ आहेस का?

अमोल : नाही.

विलास : मग तू माझ्यावर तुझं बंधुत्व का लादतोहेस?

अमोल : (प्रभाला) बघ, बघ... जळायला लागला बघ. मला सारखं वाटतंच होतं की, हा वरुन कितीही चांगला वागत असला तरी त्याला आतल्या आंत कुठंतरी तुझं सुप्त आकर्षण असणार!

विलास : (अमोलला) माझा अपमान करतोयस तू.

अमोल : म्हणजे?

विलास : सुप्त कसलं उघड आकर्षण म्हण, उघड... (मोठ्यानं हसतो)

प्रभा : तुमच्या प्रेमळ गप्पा संपल्या असतील तर जरा आवरायला घेऊया, बरीच कामं पडलीत. लवकर निघायचंय सकाळी. वेळेवर पोहचलं नाही हॉस्पिटलमध्ये तर वाटेतच बाळंत व्हायची मी!

विलास : कोणती तारीख दिलीय डॉक्टरनं?
प्रभा : उद्याची. फार फार तर परवा म्हणाले.
विलास : तू तयारीला लाग तोवर आम्ही जरा सेलिब्रेट करतो.
प्रभा : ( लटक्या रागानं) सेलिब्रेट?
अमोल : आजचा दिवस... प्लीज....
प्रभा : मी सांगून ऐकणार आहात का तुम्ही?
(विलास आनंदाने जाऊन पळत आत जातो. तो बाहेर येईपर्यंत अमोलनं बासरी काढून वाजवणं सुरू केलेलं आहे. विलास काही क्षणांनी एका ट्रेमध्ये ग्लासं घेऊन येतो. आपल्या बॅगेतून बाटली बाहेर काढतो आणि ग्लास भरू लागतो. प्रभा आत जाते.)
विलास : (एक ग्लास भरुन प्रभा गेली त्या दिशेला उंचावून जोरात.) आपल्याकडे येणाऱ्या नव्या पाहुण्याच्या स्वागतासाठी, चिअर्स...
(अमोल त्या चिअर्स मध्ये सहभागी. प्रसन्न संगीत. आनंददायी टयून सुरु. लय पकडून विलास नाचू लागतो. प्रकाश बदलतो. प्रभा आतून एका बशीतून खाण्यासाठी ड्रायफ्रूटस घेऊन येते, त्यांच्या समोरील टीपॉयवर ठेवते आणि झोपाळ्यावर बसून पाहू लागते. तिलाही आनंद मिळत आहे. काही क्षणांनी दारावरची बेल वाजते. नाच-गाणं थांबतं. प्रभा हळूहळू जाऊन दरवाजा उघडते. दारात नवलकर उभा.)
प्रभा : कोण, नवलकर?
नवलकर : हो, ओळखल्याबद्दल आभारी आहे!
प्रभा : तुम्ही का आलात परत? एकदा हाकलून लावलं होते ते आठवतंय ना?
नवलकर : (हसत) चांगलं आठवतंय. पण आमचा धंदाच असा आहे की हाकलून दिलं जाणं हे कॉलिफिकेशनच मानतो आम्ही.
विलास : (बसल्या जागेवरुन) या मिस्टर नवलकर. प्रभा, येऊ दे त्याला आत. निदान आजच्या या आनंदाच्या प्रसंगी तरी त्याला निराश करु नको (प्रभा आत येते तिच्या पाठोपाठ नवलकरही येतो.)
नवलकर : (विलासला ) आनंदाचा क्षण म्हणजे काही विशेष समारंभ वगैरे चालू आहे की काय?
अमोल : मिस्टर नवलकर, आमच्यासाठी जो क्षण आनंदाचा आहे. तो तुमच्यासाठी दुःखाचा आहे... ही बातमी ऐकून फार वाईट वाटेल तुम्हाला... प्रभा आई होणार आहे लवकरच.
नवलकर : माहिताय ते मला. पण ही बातमी माझ्यासाठी वाईट कशी काय? मी काही माणूस नाही का?
अमोल : एवढ्यासाठीचं म्हणलं की, तुमचा धंदा बुडतोय!
नवलकर : धंदा?
अमोल : नाही तर काय? तुमच्या त्या वंध्यत्वावरच्या औषधांची काहीही गरज नाही आम्हाला. शिवाय आमच्यापैकी कोणी मेलेलंही नाही अजून... तुमच्या धंद्याच्या दृष्टीनं ही परिस्थिती वाईट नाही का?
नवलकर : असं जर असेल तर मग मला आता इथं थांबलच पाहिजे!
विलास : का का का ?

नवलकर : सांगतो, पण जरा... (दारुच्या बाटलीकडे पहात) मी... जरा.... ते... तुमची हरकत नसेल तर... ( विलासच्या ते लक्षात येतं. तो एका ग्लासात दारु ओतून नवलकरला देतो. नवलकर पट्कन एक घोट घेऊन बशीतून बदाम किंवा काजूचा तुकडा उचलून खात.) वा वा... थँक्यू... मजा आया... व्वा !
अमोल : बोला.....
नवलकर : मागच्या भेटीत माझ्याविषयी तुमचा जो गैरसमज झाला होता तो आधी दूर केला पाहिजे...
अमोल : हं. आता कसं अगदी शहाण्यासारखे बोललात, म्हणजे तुमचं ते काय ते....
नवलकर : प्रतिरुप बिजारोपण!
अमोल : हां.. तर ते प्रतिरुप बिजारोपणाचं खूळ गेललं दिसतंय डोक्यातून ....
नवलकर : मी कधी म्हटलं तसं? तुम्ही मला सांगा, परमेश्वरानं दहा अवतार घेतले तर ते कसे घेतले असतील? रावणाला दहा तोंड होती तर ती कशामुळं? नल-दमयंतीची गोष्ट तर तुम्हाला नक्कीच माहीत असेल... दमयंती जेव्हा नलाच्या गळ्यात वरमाला घालायला येते तेव्हा सर्वच राजे नलासारखे दिसायला लागतात ते कशामुळं? ययातीनं आपल्या मुलाचं तारुण्य घेतलं, ते कसं? (सर्वजण शांत) या साऱ्याचा प्रतिरुप बिजारोपणाशी संबंध आहे.
अमोल : तुम्ही काहीतरी गौडबंगाल करताय, म्हणजे बुद्धीला पटत नाही ते.
नवलकर : कालीनं महिषासुराचा वध केला, हे माहिताय ना तुम्हाला.
अमोल : अर्थातच.
नवलकर : तिनं जेव्हा महिषासुराची मान कापली तेव्हा जमिनीवर पडणाऱ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबापासून नवा महिषासूर तयार होत गेला–बरोबर की नाही?
अमोल : बरोबर.
नवलकर : मग हे कशामुळं झालं?
विलास : (अभावितपणेच) प्रतिरुप बिजारोपणामुळं !
नवलकर : (खूष होत) द्या टाळी!
अमोल : म्हणजे तुम्हाला असं म्हणायचंय की एका माणसासारखा हुबेहुब दुसरा माणूस तयार करता येईल....
नवलकर : अगदी हड्रेड पर्सेंट. म्हणजे उदाहरणार्थ एका सचिन तेंडुलकरसारखे हजार सचिन तेंडुलकर तयार करु शकतो आपण.
विलास : काय म्हणता काय?
नवलकर : तेच तर सांगतोय मी.
अमोल : (रस घेत) पण तेंडुलकरसारखा दिसणारा दुसरा तेंडुलकर तसंच क्रिकेट खेळेलं का?
विलास : काहीतरी गडबड आहे!
नवलकर : घाई करू नका मी समजावून सांगतो तुम्हाला. हे बघा, (बशीतून उचलत) हा एक मनुका मी घेतला आणि हा पिस्ता घेतला, पिस्त्याच्या आतला गर हा असा काढून टाकला आणि तिथं मनुका भरला... काय झालं? तर मनुका आणि पिस्ता हे दोन्ही गुणधर्म असणारं एक नवीनच फळ जन्माला आलं...
विलास : व्वा, फार भन्नाट कल्पना आहे तुमची.
नवलकर : ही कल्पना नाही, तर जगात अनेक ठिकाणी असं घडत असतं आणि ते आजचंच नाही तर ह्या आपल्या जगाची निर्मिती झाली तेव्हापासून घडत आलंय....

अमोल : पण मनुका आणि पिस्ता यांच्या मिश्रणातून तिसरंच फळ जन्माला आलं. यात हुबेहुब पिस्ता किंवा मनुका कुठं जन्माला आला?
विलास : ब्रिलियंट क्वेश्चन!
नवलकर : (दोघांनाही लोटांगण घालत) आता तुम्ही खऱ्या अर्थानं आमच्या मंडळाचे सदस्य व्हायला पात्र ठरलात. एका वस्तुसारखी हुबेहुब दुसरी वस्तू तयार करणं यालाच आम्ही प्रतिरुप बिजारोपण म्हणतो. म्हणजे आता ह्या एका शेंगदाण्यासारखा दुसरा शेंगदाणा किंवा एका उंदरासारखा दुसरा उंदीर, एका डुकरासारखं दुसरं डुक्कर, एका मेंढीसारखी दुसरी मेंढी...
विलास : म्हणजे डॉली मेंढीविषयी बोलताय का तुम्ही?
नवलकर : ऑफकोर्स! चांगली माहिती दिसतेय तुम्हाला. डॉ. जेम्स विल्मट यांनी एका मेंढीसारखी दुसरी हुबेहुब मेंढी तयार केली आणि त्यात कुठंही नर-मादी असा संबंध येऊ दिला नाही. म्हणजे थोडक्यात प्रतिरुप बिजारोपणासाठी नर आणि मादी यांनी एकत्र येण्याची गरज नाही.
विलास : पण माणसाच्या बाबतीत हे कसं शक्य होईल?
नवलकर : का नाही होणार? आपण अनेक जुळी मुलं बघतो, बरोबर?
विलास : बरोबर.
नवलकर : मग दुसरं काय असतं ते? जुळ्या मुलांचं प्रतिरुप बिजारोपण जे निसर्ग करु शकतो ते माणूस का करु शकणार नाही? आमच्या वंशवर्धन सन्मित्र मंडळात नेमका हाच प्रयोग सुरु आहे.
अमोल : समजा, तुम्हाला माझ्यासारखाच दुसरा माणूस तयार करायचाय तर काय कराल तुम्ही?
नवलकर : सोपं आहे अगदी. तुमच्या शरीरातली एक पेशी काढायची त्या पेशीमध्ये एक अतिसूक्ष्म असा जीव असतो तो काढायचा आणि दुसऱ्या कोणत्याही एखाद्या स्त्रीच्या बिजांड पेशीमध्ये त्याची वाढ करायची. म्हणजे पिस्त्याच्या आतला गर काढून टाकायचा, साल फक्त घ्यायची. ही झाली स्त्रीची पेशी. इकडून मनुक्याच्या आतलं बी घ्यायचं, ही झाली पुरुषाची पेशी... मनुक्याचं बी पिस्त्याच्या सालात वाढल की झाला नवा मनुका तयार ... झालात हुबेहुब तुम्ही तयार ! आलं लक्षात?
विलास ह: म्हणजे यासाठी स्त्री आणि पुरुषानं एकत्रं येण्याची–
नवलकर : अजिबात गरज नाही. इतकंच काय, क्लोनिंगमुळं दोन समलिंगी स्त्रियांच्या पेशी एकत्र आणूनही मूल जन्माला घालता येईल.
प्रभा : काय म्हणता काय?
नवलकर : बेबी विदाऊट डॅडी!
प्रभा : डोकं फिरलय याचं!
नवलकर : इतकंच काय पण हिजड्यांनाही मुलं होऊ शकतील आता, हे लक्षात घ्या. (शांतता)
अमोल : पण तुम्ही शरीरातून पेशी काढता ती नेमकी कुठनं?
नवलकर : कुठूनही, तुमच्या चॉइसप्रमाणं. मलेरियाचे डॉक्टर पूर्वी आपल्या घरी यायचे आणि सुई टोचून रक्त काढायचे, आठवतंय?
विलास : हो.
नवलकर : तशी सुई टोचायचीसुद्धा गरज नाही.

अमोल : मग काय करायचं?
नवलकर : हे बघा! (बॅगेतून एक छोटी डबी काढतो, तिच्यातून एक छोटा प्लॅस्टिकचा तुकडा काढतो आणि पट्कन विलासच्या मानेजवळ त्या तुकड्यानं खरवडतो.) हे नुसतं असं खरवडायचं. तुमच्या शरीरातील काही पेशी आता ह्या तुकड्यावर आल्या. आता हा तुकडा आम्ही प्रयोगशाळेत क्रायोजेनिक स्टेटमध्ये ठेवणार.
विलास : क्रायोजेनिक स्टेट?
नवलकर : हो. तिथं तुमच्या ह्या पेशी अनंत काळापर्यंत जिवंत राहू शकतात. आवश्यकता भासली की त्यातली एक पेशी काढायची आणि तिचं प्रतिरुप बिजारोपण करायचं. आपल्याला गरज असली की बँकेतून पैसे काढून आपण वापरतो ना तितकं सोपं आहे हे. समजलं?
विलास : माझ्या पेशीपासून तयार झालेला दुसरा माणूस वयानं माझ्यापेक्षा लहान असेल ना?
नवलकर : अगदी बरोबर ओळखलंत.
विलास : पण तो माझा कोण असेल? मुलगा, भाऊ की बाप?
नवलकर : त्याची काळजी एवढ्यात करु नका. त्या माणसाच्या जन्माबरोबरच एका नवीन नात्याचाही जन्म झालेला असेल... ते एक नवीनच जग असेल... असं जग की जिथं मृत्यू नाही, नाती नाहीत आणि अश्रूंना किंमत नाही...
अमोल : म्हणजे माणूस मेला याचं दुःख आता यापुढे कुणालाही होणार नाही?
नवलकर : एवढाच मर्यादित फायदा नाही याचा.
अमोल : मग?
नवलकर ‘ अशी प्रतिरुप बिजारोपणानं तयार केलेली माणसं आपल्याला ऑपरेशनसाठी लागणारं रक्त, हार्ट, किडनी, बोनमॅरो असे सगळे अवयव पुरवतील. कल्याण होईल माणसाचं.
विलास : काय बोलताय काय?
नवलकर : समजा, एखादं बाळ जन्माला आलं आणि त्याला बोनमॅरोची गरज आहे. तर काय करणार तुम्ही? बोनमॅरो काय बाजारात मिळत नाही, शिवाय तो एकाचा दुसऱ्याला चालत नाही. अशा वेळी तुमच्याकडं घरात जर तुमचा स्वत:चा बोनमॅरो असेल...
अमोल : स्वतःचा बोनमॅरो? घरात?
नवलकर : हो, स्वत:चा बोनमॅरो. आपण जशी बामची बाटली किंवा क्रोसीनच्या गोळ्या घरात ठेवतो तसाच आपल्याला आपल्या घरात बोनमॅरो किंवा दुसरा कोणताही अवयव रेडी ठेवता येईल.
प्रभा : (उसळत) कृपा करुन थांबवा तो विषय. हा काहीतरी चेटूक करतोय आपल्यावर. हाकलून लावा याला... चल बाहेर हो! म्हणे अंग खरवडून पेशी काढायच्या...
नवलकर : पार्वतीनं आपल्या अंगाचा मळ काढून गणपती तयार केला, म्हणजे काय केलं? मी विनंती करतो तुम्हाला मिसेस देसाई तुमच्याही पेशी काढायची परवानगी द्या मला अजिबात त्रास होणार नाही. विज्ञानानं सोपं केलंय सारं काही. अशी संधी पुन्हा चालून येणार नाही.
प्रभा : थांबवा हे सगळं आणि चालते व्हा येथून ... प्लीज...
नवलकर : (थंडपणे) तुम्ही म्हणत असाल तर तुमच्या पोटातील बाळाच्या पेशीही घेऊ शकतो आम्ही.
प्रभा : त्या कशाला?

नवलकर : उद्या समजा तुमचं बाळ जन्माला येता येता गुदमरून गेलं तर त्याच्यासारखच दुसरं बाळ– (विलास लाथा बुक्क्यांनी नवलकरला मारु लागतो. अमोल अवाक् होऊन पाहात आहे. प्रभा आक्रंदन करीत आहे)
नवलकर : ( मार खाता खाता.) अहो पण माझा उद्देश लक्षात घ्या तुम्ही. संपूर्ण मानव जातीचं कल्याण आहे यात. नवा रोगमुक्त माणूस जन्माला घालू शकतो आपण. कॅन्सर नाही, डायबिटीस डायबिटीस की, पार्किन्सन्स्चा आजार नाही... (मार खात असताना उठता उठता खिशातून कार्ड काढून टीपॉयवर ठेवत) हे माझं कार्ड... कधी गरज लागली तर अवश्य बोलवा...
प्रभा : काही गरज नाही लागणार तुझी कोणाला. यमदुताहूनही भयंकर आहेस तू.
अमोल : (नवलकरला फरफटत नेत) हलकट साला... परत दिसलास तर तुला उभा चिरुनच टाकतो भडव्या...
(त्याला बाहेर काढून दार लावून आत येतो. प्रभा हुंदके देता देता एकदम कळाही देऊ लागते. आईऽऽऽ, आई गंऽऽऽ)
अमोल : विलास चल पळ लवकर, पोटात दुखायला लागलं हिच्या... (धावत आत जातो तिची बॅग घेऊन बाहेर येतो. दोघेही तिला धरुन उचलतात. अमोल पुढे ती मध्ये आणि विलास मागे. जाता जाता विलास हळूच टीपॉयवरचे कार्ड उचलून आपल्या खिशात ठेवतो. अंधार. अंधारातून सुसाट वेगाने गाडी जात असल्याचा आवाज. त्यात ट्रॅफिकचे आवाज मिसळलेले, त्यातच प्रभाच्या कळा ऐकू येत आहेत. आणि अशातच त्यांच्या गाडीला अपघात झाल्याचा भयंकर आवाज. प्रचंड किंकाळ्या. आरडाओरड गोंधळ, ॲम्बुलन्सचा आवाज. थरका उडवणारा तो गोंधळ सुरू असताना अंधारातच पडदा.)

**मध्यंतर**

***

सूचना :
(या नाटकाची पूर्ण संहिता प्राप्त करून घ्यावयाची असल्यास वेबसाईटमध्ये दिलेल्या पत्त्यावर लेखकाशी संपर्क साधावा. नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, त्याचे अभिवाचन, यूट्युब/ फेसबुकवरील किंवा कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून पूर्ण किंवा अंशत: अशा कोणत्याही आविष्कारापूर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक.)

***